

इतरांशी कधी कधी खोटे बोलणे शक्य असले, तरी स्वतःशी नेहमी प्रामाणिक रहा.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २७ एप्रिल २०२५ | अंक १३६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007

All TOURS घर से घर तक दिल से दिल तक TIME IN TRAVEL INDUSTRY

www.suntourismpune.in

सन टुरिझम

प्रस्तुत करते

देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-

99222 22272 / 7602727555

कोणीही फार दीर्घकाळ कोणत्याही पदावर राहात नाही.फडणवीसांचं मुख्यमंत्रिपदावर मोठं विधान

मुख्यमंत्रिपदावर फडणवीसांचं मोठं विधान, म्हणाले..

राज्याच्या राजकारणात नेहमीच काहीतरी घडत असतं. भाजपाचे नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे (Chandrashekhar Bawankule) यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत मोठं विधान केलं आहे. ते आगामी 2034 सालापर्यंत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहणार आहेत, असं त्यांनी जाहीरपणे बोलून दाखवलंय. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या आहेत. आता खुद्द देवेंद्र फडणवीस यांनीदेखील यावर प्रतिक्रिया दिलीय. ते माध्यम प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देत होते.

बावनकुळे यांच्या हातात असले तर...“बावनकुळे यांच्या हातात असले तर ते आगामी 100 वर्षे मलाच मुख्यमंत्री म्हणून ठेवतील. पण त्यांच्या शुभेच्छांचा आपण मतीतार्थ समजून घ्यावा. त्यांनी माझ्या चांगल्यासाठीच मला या शुभेच्छा दिल्या आहेत,” असा अर्थ त्यांनी बावनकुळे यांच्या विधानाचा लावला. माझी भूमिका जेव्हा बदलायची...

बाकी राजकारणात भूमिका बदलत असतात. या भूमिका बदलललल्याही पाहिजेत. कोणीही फार दीर्घकाळ कोणत्याही पदावर राहात नाही. त्यामुळे माझी भूमिका जेव्हा बदलायची तेव्हा बदलेल, असं सांगत भविष्यात माझी भूमिका बदलू शकते अन्यथा काहीही होऊ शकतं असे संकेत दिले.

चंद्रशेखर बावनकुळे नेमकं काय म्हणाले होते? चंद्रशेखर बावनकुळे हे एका सभेत बोलत होते. या सभेत बोलताना त्यांनी देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्रिपद यावर भाष्य केलं. फडणवीस हे आगामी 2034 सालापर्यंत मुख्यमंत्रिपदावर कायम राहणार आहेत. फडणवीस यांचा विकसित महाराष्ट्र घडवण्याचा संकल्प आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रिपदी असल्याशिवाय विकसित महाराष्ट्राचा संकलप पूर्ण होऊ शकत नाही. देवेंत्र फडणवीस यांच्याच नेतृत्त्वात आपल्याला पुढे जायचे आहे, असं बावनकुळे म्हणाले होते.

एकनाथ शिंदेंची एका शब्दात प्रतिक्रिया दरम्यान, बावनकुळे यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. बावनकुळे यांच्या विधानाचे वेगवेगळे अर्थ काढले जात आहेत. त्यांच्या याच विधानाबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारण्यात आले. त्यांनी यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. फक्त हात जोडून त्यांनी शुभेच्छा असं म्हटलं.

पैठण- पंढरपूर पालखी मार्ग चौपदरीकरण करण्याची आ. रोहित पवार यांची मागणी. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना केली मागणी.

खर्डा (प्रतिनिधी) प्रा. महेश बजगुडे

पैठण पंढरपूर पालखी मार्ग (राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ ई) च्या पहिल्या टप्प्यातील पैठण ते खर्डा पर्यंतचे काम पुर्णत्वाच्या स्थितीत आले असतानाच पुढील टप्प्यातील धाराशिव जिल्ह्यातील काम वेगात सुरू झाले असून त्यामध्ये खर्डा शहरांतर्गत जाणाऱ्या या महामार्गाचे चौपदरीकरण व इतर अनुषंगिक कामे करावीत अशी मागणी आमदार रोहितदादा पवार व खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांनी दिली. पंढरपूर कडे जाणाऱ्या प्रमुख पालखी मार्गांची सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेत संत एकनाथ महाराजांच्या पालखीचा मार्ग असलेल्या पैठण ते पंढरपूर मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा दिला. पहिल्या टप्प्यात पैठण ते मुंगी, हातगाव, बोधेगाव, लाडजळगाव, शेकटे, मिडसांगवी, कासाळवाडी, पाटोदा येथून जामखेड तालुक्यातील दिघोळ, मोहरी ते खर्डा पर्यंतच्या रस्त्यासाठी निधी उपलब्ध होत कामही जवळपास पुर्णत्वास आले आहे. त्यानंतर खर्डा ते पंढरपूर या दुसऱ्या टप्प्यातील मार्गाचे काम मात्र खर्डा शहरांतर्गत रस्ता तसेच येथून

जाणाऱ्या राज्य मार्ग क्रमांक ५७ ला वगळून खर्ड्यापासून चार किलोमीटर अंतरावरील धाराशिव जिल्ह्यातील तिंत्रज फाट्यापासून सुरू झाले आहे. खर्डा शहरात हा मार्ग जातेगाव फाटा ते बसस्थानक ते भुईकोट किल्ला असा दोन किलोमीटर लांबीचा आहे. यातील श्री क्षेत्र सिताराम गड ते भुईकोट किल्ला या मार्गावर आमदार रोहितदादा पवार यांच्या प्रयत्नातून रस्ता दुभाजकासह पथदिवे बसवण्याचे काम पूर्ण झाले आहे. परंतु, जातेगाव फाटा ते श्री क्षेत्र सिताराम गड पर्यंत रस्ता दुभाजक टाकणे, या संपुर्ण मार्गाचे काँक्रीटीकरणासह आणखी रुंदीकरण करणे, गटार बांधणे, पदपथ बांधणे, बसस्थानक परिसरात दुभाजक नसलेल्या मार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पथदिवे बसवणे, किल्ल्या समोर विशेष व आकर्षक पथदिवे बसवणे, दुभाजकावर तसेच रस्त्याच्या कडेने वृक्षलागवड करणे, जातेगाव फाटा व किल्ल्या समोरील ईट फाटा येथे सर्कल मार्ग करणे इ. कामे यामध्ये सूचविण्यात आली आहेत.खर्डा शहरातून जाणाऱ्या या मार्गावरील मोठी वाहतूक, विद्यार्थी, नागरिकांची वर्दळ इ. मुळे आणखी रुंदीकरण व पदपथ आवश्यक असून त्यासाठी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांनी आमदार व खासदारांच्या मार्फत थेट केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना साकडे घातले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आगमन व स्वागत

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आज सकाळी नांदेड विमानतळावर आगमन झाले. यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार विक्रम काळे, आमदार राजू नवघरे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी त्यांचे पुस्तक देऊन स्वागत केले. यावेळी नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर आदींची उपस्थिती होती. यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार परभणी जिल्ह्यातील नियोजित दौऱ्यासाठी रवाना झाले.

रसायनशास्त्र विषयात विद्यार्थ्यांना नोकरीच्या अनेक संधी- प्राचार्य डॉ.संतोष उंदरे बलभीम महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित पदव्युत्तर द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात प्रतिपादन

बीड-प्रतिनिधी: अंकुश गवळी - रसायनशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना पदवी प्राप्त केल्यानंतर नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. महाविद्यालयातून मिळालेल्या ज्ञानाच्या शिदोरीवर आपण रसायनशास्त्रामध्ये ज्या काही करिअर संधी असतील त्या मिळवाव्यात. एम. एसी. पास झाल्यानंतर विद्यार्थ्यांना नौकरीसाठी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून नोकरीसाठी आजपर्यंत सहकार्य करत आलेले आहे व येथून पुढेही विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यात येईल. असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य व रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. संतोष उंदरे यांनी केले. येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि. २६ एप्रिल रोजी रसायनशास्त्र विभागाच्या

वतीने पदव्युत्तर द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्राचार्य डॉ.संतोष उंदरे अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना बोलत होते. याप्रसंगी मंचावर डॉ. महादेव साखरे, प्रा. एस. ए. सुरवसे, डॉ. ए. बी. दन्ने यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रा. एस. ए. सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना रसायनशास्त्र विभागाची गौरवशाली व यशस्वी परंपरा विद्यार्थ्यांना सांगितली तसेच रसायनशास्त्र विभागातील अनेक गुणवंत विद्यार्थांनी एम.एस्सी केल्यानंतर त्यांनी अनेक क्षेत्रात उत्तुंग अशी झेप घेत रसायनशास्त्र विभागाचा यशाचा आलेख वाढवला आहे, आपणही अशाप्रकारे आपल्या ज्ञानाच्या जोरावर करिअरच्या संधी मिळवाव्यात असा मौलिक सल्ला दिला. डॉ. महादेव साखरे यांनी विद्यार्थ्यांना रसायनशास्त्रातील करिअरच्या संधी बद्दल मार्गदर्शन करून जीवनाकडे सकारात्मक पहावे असा सल्ला दिला. यावेळी कु.आदिती काटकर व मोहन काळे या दोन गुणवान विद्यार्थ्यांचा प्राचार्यांच्या हस्ते रसायनशास्त्र विभागा तर्फे विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात बोलताना म्हटले की, रसायनशास्त्र विभागातील गुरूजन उच्च विद्याविभूषित असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे आम्हाला रसायनशास्त्र विषय सोपा वाटला. जिल्ह्यातील या नामांकित महाविद्यालयात शिकताना नवनवीन गोष्टी शिकायला मिळाल्या व जीवनात यशस्वी होण्याची सकारात्मकता आमच्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ.पी. डी. जावळेपाटील यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रा. एस. ए. सुरवसे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.जी. डी खान, प्रा, लोकरे, प्रा. खरात यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमासाठी रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महावितरणच्या गलधान कारभारामुळे जनावरांना पिण्यासाठी पाणी नाही ; सबस्टेशनमध्ये जनावरे आणायची का?

शेतकरी भिमराव सुरवसे महाजनवाडीकर यांचा संतप्त सवाल :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- (दि.२६) बीड तालुक्यातील लिंबागणेश उपकेंद्र येथील बोरखेड फिटरचे केबल जळाल्याने २ दिवसांपासून महाजनवाडी येथील ग्रामस्थ अंधारात असुन जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.वीज नसल्याने मुक्या जनावरांना पिण्यासाठी पाणी देता येत नसल्याने शेतकरी संतप्त झाले असुन सबस्टेशनमध्ये जनावरे आणायची का? असा संतप्त सवाल शेतकरी भिमराव सुरवसे यांनी केला आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी

तातडीने वीज पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी केली आहे. महावितरण उप अभियंता शिंदे २ दिवसांपासून फोनच घेत नाही ; जनावरांना पाणी कुठुन आणायचे ? :- विश्वंभर गिरी (सरपंच महाजनवाडी) बोरखेड फिटरचे केबल लिंबागणेश येथील उपकेंद्रात जळाल्याने २ दिवसांपासून गावाला वीज पुरवठा खंडित आहे. माणसं उकाड्याने हैराण झाली आहेत. मुक्या जनावरांचा पाण्याचा प्रश्न आहे.२ दिवसांपासून लिंबागणेश उपकेंद्राचा चार्ज असणारे उप अभियंता अभिजित शिंदे यांना २ दिवसांपासून फोन लावतोय पण फोन उचलत नाहीत. लवकरात लवकर जळालेल्या केबलच्या ठिकाणी नविन केबल टाकुन वीजपुरवठा सुरळीत नाही केला तर आम्ही ग्रामस्थ रस्त्यावर उतरू असा महावितरणला इशारा देत असल्याचे महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी म्हणाले.

नांदेड जिल्ह्यात मिरची संशोधन केंद्र व केळी क्लस्टर उभारण्यावर भर दिशा समितीच्या बैठकीत विविध विकास कामांचा आढावा व सूचना

जिल्हा प्रतिनिधी:- किशन चुंचलवाड

नांदेड दि. 24 एप्रिल : जिल्ह्यातील विविध विकास योजना तसेच विकास कामांबाबत जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) बैठकीत सर्वंकष आढावा घेण्यात आला. योजना, उद्दीष्टांच्या अंमलबजावणीसाठी विविध विभागांकडून काटेकोर नियोजन करण्यात यावेत, असे निर्देश खासदार रविंद्र चव्हाण यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन येथे आज दिशा समितीच्या बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार शिवाजी काळगे, खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार राजेश पवार, आमदार भिमराव केराम, आमदार आनंदराव तिडके, आमदार श्रीजया चव्हाण , जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी आदींची उपस्थिती होती. बैठकीत सुरवातीला 3 जुलै 2023 रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले व त्यास मान्यता देण्यात आली. जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीच्या विविध योजनेच्या कामाचा विस्तृत आढावा घेण्यात आला. डीजीटल योजना यामध्ये प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात इंटरनेट सुविधा तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर स्थापन करण्याबाबत, महामार्गाच्या पायाभुत सुविधा, दूरसंचार पायाभूत सुविधा कार्यक्रम, खाण पायाभूत सुविधा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, सार्वजनिक पाणी पुरवठा विहिरी, वैयक्तिक सिंचन विहिरी, दिनदयाळ अंत्योदय योजना, दिनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम, प्रधानमंत्री आवास योजना शहरी व ग्रामीण, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम, राष्ट्रीय आरोग्य अभियान, सर्व शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना, एकात्मिक बालविकास योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रम, अमृत मिशन 2.0, स्वच्छ

भारत मिशन ग्रामीण, सर्व शिक्षा अभियान या योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. अध्यक्ष खासदार रविंद्र चव्हाण यांनी विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावाणीसाठी संबंधित यंत्रणेने त्वरीत कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण, शहरी भागातील रस्ते, पिण्याचे पाणी, विद्युत विषयक समस्या, शहरातील स्वच्छता, वाहतुक समस्या, रेल्वे विषयक समस्या, शहरातील पार्कींगची समस्या, स्ट्रीट लाईट, ड्रेनेज लाईन, आरोग्य, शहर बस सेवा, गोदावरी नदी स्वच्छता इत्यादी विषयावर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना विचारणा करुन यावर उपाययोजना करण्याबाबत सूचना दिल्या. यावेळी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी मार्च 2026 पासून शहराला दररोज पाणी पुरवठा करण्याचे नियोजन असल्याचे सांगितले. तसेच मल्टी पार्कीग साठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. नांदेड शहरात अधिकची स्मशान भूमी उभारण्यात यावी. तसेच आरोग्य उपकेंद्र नायगावला स्थलांतर करणे, केळी उद्योग, मिर्ची संशोधन केंद्र उभारण्यावर भर देण्यात येइल अशी मागणी सर्वानुमते यावेळी करण्यात आली. तसेच कासराळी येथे मिरची व सोयाबीन, अर्धापूर शिवारात केळी क्लस्टर उभारण्याबाबत मागणी करण्यात आली. बैठकीत अनुषंगीक योजना तसेच त्यातील कामा बाबत अहवाल संबंधीत यंत्रणांनी सादर केला. त्यावर उपस्थित समिती सदस्यांनी विविध मुद्यांवर चर्चा करुन उपयुक्त सूचना केल्या. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले व शेवटी आभार मानले.

0 0 0 0

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार २७ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com

संपादकीय

कांदा उत्पादक शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट, बाजारभाव कोसळले अन प्रतवारी खराब

नाशिक जिह्ला कांद्याची बाजारपेठ म्हणून देशभरात प्रसिद्ध आहे. नाशिकमधील लासलगाव कांद्याची सर्वात मोठी बाजारपेठ आहे. कांद्याची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लासलगावसह परिसरातील कांदा उत्पादक शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहे. कांद्याचे सरासरी बाजार भाव आठशे ते एक हजार रुपयांपर्यंत खाली कोसळले आहे. वाढत्या उन्हामुळे शेतात काढून ठेवलेल्या उन्हाळ कांद्याची प्रतवारी खराब होत आहे. यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या डोकेदुखीत वाढ झाली आहे.

यंदा उन्हाळी कांद्यासमोर अनेक अडचणी निर्माण झाल्या. अवकाळी पावसाचा फटका कांद्याला बसला आहे. तसेच यंदा कांद्याचे दर कोसळले आहे. एप्रिल महिन्यात पडलेल्या उन्हामुळे शेतात काढून ठेवलेल्या उन्हाळी कांद्याची प्रतवारी खराब होत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी आता कांदा उत्पादक शेतकरी आपला कांद्याची प्रतवारी करुन साठवणूक करत आहेत. तसेच ज्यावेळेस कांद्याच्या बाजारभावात वाढ होईल, त्यावेळेस हा साठवणूक केलेला कांदा बाजारात विक्रीसाठी आणला जाईल, असे कांदा उत्पादक शेतकरी सांगत आहे.

मागील आठवडाभरातील राज्यात कांद्याची आवक 2 लाख 37 क्विंटल झाल होती. यामध्ये नाशिक जिल्ह्यात उन्हाळ कांद्याची सर्वाधिक 1 लाख 44 हजार क्विंटलची आवक झाली. या आठवड्यात उन्हाळी कांद्याला कमीत कमी 840 रुपये तर जास्तीत जास्त 1250 रुपये दर होता.

दोन दिवसांपूर्वी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व माजी खासदार राजू शेट्टी लासलगाव बाजार समितीत भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधत केंद्र सरकार टीका केली होती. यावेळी बोलताना राजू शेट्टी यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या आयात निर्यात धोरणामुळेच कांद्याच्या बाजारभावावर परिणाम होत आहे. गेल्यावेळी प्रोडूसर कंपन्यांमार्फत खरेदी करत मोठा भ्रष्टाचार झाला होता. त्यामुळे नाफेडने थेट बाजार समितीत उतरून कांद्याची खरेदी केली पाहिजे. शेतकऱ्यांजवळ असलेली विजेची थकबाकी ही शेतकऱ्यांचीच आहे का? तितकी वीज शेतकऱ्यांनी वापरली आहे का? त्याची तपासणी केली पाहिजे, असे राजू शेट्टी यांनी म्हटले आहे.

दहशतवाद ठेचून काढा

भारतात गत दशकभरात काश्मीर वगळता देशाच्या इतर भागात मोठा दहशतवादी हल्ला घडून आलेला नाही, हे आपल्या सुरक्षा यंत्रणांचे, पोलिस प्रशासनाचे, गुप्तचर यंत्रणांचे आणि पर्यायाने शासनाचे मोठे यश आहे असे म्हटले जाते. परंतु याचा अर्थ दहशतवाद संपुष्टात आला असे नाही. आधुनिक जगतात दहशतवाद हा केवळ सुरक्षेशी संबंधित प्रश्न न राहता सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थैर्यासाठी मोठा धोका ठरत आहे. अलिकडे प्रसिद्ध झालेल्या जागतिक दहशतवाद निर्देशांक २०२५ नुसार दहशतवादाचा धोका कमी झालेला नाही. उलट त्याच्या स्वरूपात लक्षणीय बदल झाला आहे. जागतिक दहशतवाद निर्देशांक २०२५ मध्ये भारताचा क्रमांक १४ वा आहे. भारताची स्थिती पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या तुलनेत बरी असली तरी भारत पूर्णपणे दहशतवादमुक्त नाही. सीमापार दहशतवाद ही भारतासाठी आजही मोठी समस्या आहे, जी प्रामुख्याने पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादी संघटनांमार्फत चालवली जाते. जैश-ए मोहम्मद, लष्कर-ए-तैयबा आणि हिज्बुल मुजाहिद्दीन सारख्या संघटना जम्मू-काश्मीरमध्ये अनेक वर्षांपासून सक्रिय आहेत. अलिकडे सुरक्षा दलांनी ऑपरेशन ङ्कऑल आऊटफ सारख्या मोहिमेद्वारे काही प्रमाणात यश मिळवले असले तरी पाकिस्तान पुरस्कृत घुसखोरी आणि कट्टरतावादी कारवाया अद्यापही सुरू आहेत. याचे ताजे उदाहरण म्हणजे मंगळवारी पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेला भ्याड हल्ला. पहलगाम हल्ल्याची तुलना हमासने इस्रायलवर केलेल्या हल्ल्याशी होऊ लागली आहे. त्यामुळे आता पाकिस्तानविरोधात लष्करी कारवाई करण्यासाठी सरकारवर दबाव वाढू लागला आहे. पहलगाममध्ये हिंदू धर्मियांना वेचून लक्ष्य केल्याचे स्पष्ट झाले आहे. बैसरनमध्ये मंगळवारी झालेल्या हल्ल्यात सात दहशतवाद्यांचा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून त्यातील चार ते पाच जण हे पाकिस्तानातून घुसखोरी करून आले असल्याची शक्यता आहे. हल्लेखोरांच्या शरीरावर कॅमेरे लावण्यात आल्याची शंकाही जम्मू काश्मीरमधील एका पोलिस अधिका-याने बोलून दाखवली. हल्लेखोरांसमवेत किमान दोन स्थानिक अतिरेकी असावेत असाही अंदाज आहे. गत काही वर्षांपासून अशा हल्ल्यांमध्ये अतिरेक्यांच्या कपड्यांवर किंवा त्यांच्या बंदुकांवर कॅमेरे लावलेले असतात. नरसंहाराचे चित्रीकरण करून त्याचा दुरुपयोग केला जातो. पहलगाममध्ये निरपराध पर्यटकांचा बळी गेल्याने त्याचा बदला घेण्याची संतप्त लोकभावना व्यक्त होत आहे. हल्ल्याच्या निषेधार्थ काश्मीरमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. गत ३५ वर्षांत काश्मीरमध्ये असे कधी घडले नव्हते. पहलगाम हल्ल्याविरुद्ध कडक कारवाई केली जाईल. दहशतवाद्यांना सोडले जाणार नाही. भारत योग्य वेळी प्रत्युत्तर देईल. दहशतवादाविरुद्ध आमचे शून्य सहनशीलतेचे धोरण आहे, अशा शब्दांत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी संताप व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून तातडीने भारतात परतले. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. राजधानीत दिवसभर उच्चस्तरीय बैठकांचा सिलसिला सुरू होता. सुरक्षा यंत्रणांनी तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांची स्केचेस प्रसिद्ध केली असून त्यांची पहलगाम जंगलात नाकाबंदी करून कसून शोध घेतला जात आहे. पंतप्रधान मोदी यांनी दिल्ली विमानतळावरच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ, जनरल अनिल चौहान, तिन्ही लष्करी दलांचे प्रमुख, संरक्षण सचिव आणि लष्करी संचालनालय प्रमुख यांची बैठक घेऊन सुरक्षेचा आढावा घेतला. तसेच लष्कराला युद्धाच्या तयारीत राहण्याचे आणि दहशतवादविरोधी कारवायांची मोहीम तीव्र करण्याचे आदेश दिले. कलम ३७० हटवल्यानंतर काश्मीरमध्ये पहिल्यांदाच इतका मोठा दहशतवादी हल्ला झाला आहे. दहशतवाद्यांना आणि त्यांच्या समर्थकांना योग्य उत्तर देणे आता अनिवार्य बनले आहे. दहशतवादाविरुद्ध लढण्याची प्रतिज्ञा घेण्यासोबतच ती साध्य करण्यासाठी ठोस रणनीती आखावी लागेल. पाकिस्तानमधील तळांवरून कार्यरत असलेल्या दहशतवादी संघटनांनी सुरक्षा दलाच्या छावण्यांवर हल्ला करण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांवरील हल्ल्यांची रणनीती अवलंबण्यास सुरुवात केली आहे. यामागील हेतू पर्यटन वा इतर कारणांसाठी काश्मीरमध्ये येणा-यांमध्ये भीती निर्माण करणे हा आहे. दहशतवाद्यांनी केवळ पर्यटकांनाच मारले नाही, तर काश्मिरी जनतेच्या पोटावरही लाथ मारली आहे. या भयंकर हल्ल्यानंतर खो-यातील पर्यटनाशी संबंधित व्यवसायही जवळपास ठप्प होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने पाकिस्तानची नाकेबंदी करण्यास सुरुवात केली आहे. भारताने या हल्ल्यानंतर पाकिस्तानवर थेट आरोप केला असून पाकिस्तानी दूतावास बंद करण्यास सांगितले आहे. पाकिस्तान नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत. अटारी चेकपोस्ट बंद करण्यात आला आहे. १९६० साली लागू झालेला सिंधू पाणी करार भारताने रद्द केला आहे. पाकिस्तानवर याचा मोठा परिणाम होणार आहे. ङ्कसार्कफअंतर्गत पाकिस्तानी नागरिकांना देण्यात येणारी व्हिसा सूट रद्द करण्यात आली आहे. भारतात राहणा या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत भारत सोडण्यास सांगण्यात आले आहे. भारतातील सर्व पाकिस्तानी लष्करी सल्लागारांनाही एका आठवड्याच्या आत भारत सोडण्यास सांगण्यात आले आहे. पाकिस्तानची २३ टक्के अर्थव्यवस्था आणि ३४ टक्के कर्मचारीवर्ग सिंधू नदीच्या पाण्यावर अवलंबून आहे. पाकिस्तानच्या एकूण पाण्यापैकी ८५ टक्के पाणी सिंधू आणि तिच्या उपनद्यांमधून येते. भारताच्या पाणीबंदीमुळे पाकिस्तानातील शेती, उद्योग आणि दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होणार आहे. पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला हा धक्का इतका मोठा असेल की त्यामुळे सामाजिक अस्थिरता आणि आंतरराष्ट्रीय तणाव वाढू शकेल. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार पाण्याचा प्रवाह रोखणे हे युद्धाचे कारण ठरू शकते. भारताचा हा निर्णय केवळ पाकिस्तानपुरता मर्यादित नाही. बांगलादेशच्या सरकारलाही हा इशारा आहे. पहलगाम हल्ल्यामागे सैफुल्लाह खालिद कसुरीचा हात असल्याचे भारताने म्हटले आहे. परंतु या हल्ल्यामागे आपला हात नसल्याचे त्याने म्हटले आहे. या हल्ल्याचा पाकिस्तानशी काहीही संबंध नाही. आंतरराष्ट्रीय समुदायाने भारताविरुद्ध भूमिका घ्यावी आणि सत्याला साथ द्यावी, असे आवाहन कसुरीने केले आहे. चोराच्या उलट्या बोंबा अशाच असतात. त्यांच्याविरुद्ध कठोर पावले उचललीच पाहिजेत

१४ वर्षीय मुलीवर अत्याचार; पोलिसांसोबत आरोपीचे रिल्स समाज माध्यमावर व्हायरल

: बीडच्या नेकनुर पोलीस ठाणे हद्दीत १४ वर्षीय मुलीवर अत्याचार करण्यात आल्याची घटना उजेडात आली आहे. दरम्यान हे संतापजनक कृत्य करणाऱ्या तरुणाविरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणानंतर संपूर्ण बीड जिल्हा राज्यात नव्हे तर देशात चर्चेत आला आहे. दरम्यान, बीडची गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली असतानाच, बीडच्या नेकनूर पोलीस ठाणे हद्दीतून आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बीडच्या नेकनुर पोलीस ठाणे हद्दीत १४ वर्षीय मुलीवर अत्याचार करण्यात आल्याची घटना उजेडात आली आहे. दरम्यान हे संतापजनक कृत्य करणाऱ्या तरुणाविरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल

करण्यात आला आहे. तर पवन निर्मळ असे या आरोपीचे नाव असून या घटनेनंतर तो फरार झाला असल्याची माहिती पुढे आली आहे. पुढे आलेल्या माहितीनुसार, पवन निर्मळने नात्यातीलच एका १४ वर्षीय मुलीच्या घरी जाऊन मुली सोबत अश्लील लैंगिक चाळे केले. कालांतराने घटनेची माहिती मुलीने कुटुंबीयांना दिल्यानंतर पवन विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. धक्कादायक बाब म्हणजे या आरोपीचे अनेक रिल्स नेकनूर पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांसोबत असल्याचे समोर आले आहे, आणि हेच रिल्स सध्या समाज माध्यमांवर व्हायरल देखील होतायत. आरोपीच्या अटकेसाठी नेकनूर पोलिसांचे एक पथक रवाना करण्यात आले आहे. मात्र आरोपी हा पोलिसांच्या जवळचा असल्याने त्याच्यावर कारवाई होत नसल्याचा आरोप मुलीच्या नातेवाईकांकडून करण्यात आला आहे.

आयुष्य खुप सूंदर आहे ते जगता आले पाहिजे-उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर

केज । प्रतिनिधी जगातील सर्वात सुंदर रोपटे विश्वासाचे असते आणि ते कोठे जमिनीत नाही तर आपल्या मनात रुजवले पाहिजे. आरश्यात दिसणाऱ्या स्वतःला आहे तसं स्वीकारायला शिका खरंच आयुष्य खुप सूंदर आहे, फक्त ते जगता आले पाहिजे. आयुष्यामध्ये चढ-उतार हास्य-अश्रू यश-अपयश येतच असतात. हे सर्व माणसाच्या जीवनाचा भाग आहे. आणि हेच जीवनाला सुंदर आणि खरोखर जगण्यासारखे बनवतात. नातेसंबंध टिकवण्यासाठी, संवाद, आदर, विश्वास आणि प्रामाणिकपणा अत्यंत आवश्यक आहे. तसेच या धकाधकीच्या जीवनामध्ये माणसा-माणसांमधील संवाद हरवत चाललाय. तेंव्हा एकमेकांशी संवाद साधणे अत्यंत गरजेचे आहे. आपले विचार, भावना आणि अपेक्षा स्पष्टपणे व्यक्त करणे, एकमेकांच्या मतांचा, भावनांचा आदर करणे, एकमेकावर विश्वास ठेवणे, विश्वासघात टाळणे, परस्परांना समजून घेणे वेळप्रसंगी अडचणीच्या वेळी साथ देणे, त्यांच्या चांगल्या कामाची प्रशंसा करणे निर्माण होणारे वाद मिटवणे, कठीण परिस्थितीतही एकमेकांना साथ देणे एकमेकांचा आधार बनणे तसेच नातेसंबंध टिकवण्यासाठी प्रयत्न करणे आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन छत्रपती संभाजी नगर येथील उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांनी केले. केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि. २३ एप्रिल रोजी जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्रीमती. अंजली अभय धानोरकर, उपजिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर या उपस्थित होत्या तर अध्यक्ष म्हणून नंदकिशोर मुंदडा हे उपस्थित होते. याप्रसंगी जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे सचिव जी. बी. गदळे, सहसचिव उपेंद्र कोकीळ, नारायण अण्णा अंधारे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, प्राचार्य शंकर मैरट, प्रा. वि. चे मु. अ. वसंतराव शितोळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी लाभलेल्या उपस्थित पाहुण्यांचा परिचय सुरेखा डांगे मॅडम यांनी दिला. चौथे पुष्प गुंफताना रंग मनाचे रंग नात्याचे या विषयावर बोलताना अंजली धानोरकर पुढे म्हणाल्या, एकत्र कुटुंबपद्धती हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य होते. परंतु आता विभक्त कुटुंबपद्धती दिसून येते. तेंव्हा जीवनातील विविध आव्हानांना सामोरे जात असताना एकमेकांवरील अतूट विश्वास किती महत्त्वाचा असतो हे २०१३ मध्ये उत्तराखंडमधील केदारनाथ येथे अचानक आलेल्या प्रलयकारी महापुराच्या अनुषंगाने सांगितले. या महाप्रलयाने हजारो लोकांच्या जीवनावर परिणाम झाले. त्यामुळे बाधितांचे जीवन उध्वस्त झाले. त्या प्रलयामध्ये विजयसिंह नामक तरुणाला स्वतःची पत्नी लीला हिला गमवावे लागले. हे सत्य त्याच्या कुटुंबाने स्वीकारले, परंतु त्याचा मात्र ठाम विश्वास होता की,कधीतरी ती मला भेटल, या विश्वासाने तो तिथेच राहिला. या अतूट विश्वासाला १९ महिन्यांची प्रतीक्षा करावी लागली. शेवटी त्या विश्वासाचे सार्थक झाले व त्या दोघांची भेट झाली. एवढा अतूट विश्वास एकमेकांवर असला पाहिजे. यावेळी अशा अनेक प्रसंगांना आपल्या वर्णनातून रेखाटण्याचा प्रयत्न अंजलीताई धानोरकर यांनी केला. अध्यक्षीय समारोपात नंदकिशोरजी मुंदडा म्हणाले, स्व. विश्वंभर कोकीळ हे संघर्ष करण्याची ताकद असणारे व्यक्तिमत्व होते. परखडपणे मत व्यक्त करणे हा त्यांचा स्वभाव होता तर सुसंवाद साधून प्रश्न सोडविणे हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. अशा व्याख्यानमालेतून वैचारिक पिढी निर्माण होते. व अशी पिढी कुटुंबापलीकडे समाजाप्रती अथवा देशासाठी निष्ठेने कार्य करते. सध्याच्या काळामध्ये नाती विस्कटली जात आहेत, परंतु आपल्या अंतर्मनात चांगले भाव असतील तर चुकीच्या गोष्टीचे समर्थ न करता समाजामध्ये चांगले विचार पेरण्याचा निश्चित प्रयत्न होऊ शकतो. शेवटी त्यांनी अंबेजोगाई मधील वसंत व्याख्यानमालेचे स्वरूपही उपस्थित श्रोत्यांना सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अपर्णा देशपांडे मॅडम यांनी केले तर आभार गौरी जगताप मॅडम यांनी मानले.

मा. प्राचार्य प्रा. डॉ.जगदीश जगतकर यांना मातृशोक

परळी प्रतिनिधी - परळी येथील वैद्यनाथ कॉलेजचे माजी प्राचार्य प्रा.डॉ. जगदीश जगतकर व संजय जगतकर गजानन जगतकर यांच्या मातोश्री व श्रीकांत कसबे यांच्या आजी गंगुबाई वैजनाथराव जगतकर यांचे अल्पशा आजाराने दि.26/04/2025 रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. तीन मुले एक मुलगी आहे. त्यांच्या पश्चात सुना नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. अंत्यविधी वेळ 9 वा.शांतीवन स्मशानभूमी भीमनगर जगतकर गल्ली या ठिकाणी करण्यात आला. अंत्यविधीस शहराचे प्रतिष्ठित नागरिक, प्राध्यापक, शिक्षक, वकील, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या दुःखद निदाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २७ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com

कासलेनंतर सायबरमधील सुनील नागरगोजे निलंबित

सायबर विभागातील बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले नंतर आता त्याच विभागातील पोलीस निरीक्षकाला सेवेतून बडतर्फ करण्यात आलंय. सुनील नागरगोजे असे पोलीस निरीक्षकाचे नाव असून, पोलीस महासंचालक कार्यालयाने संबधित प्रकरणाची सुनावणी केल्यानंतर नागरगोजे यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आलीय. तत्कालीन पोलीस अधीक्षक यांना शिवीगाळ करणे त्याचबरोबर कर्मचाऱ्यांना धमकावणे या कारणामुळे बडतर्फ करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. सुनील नागरगोजे यांनी बीडचे तत्कालीन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्याशी उद्धटपणे वागून शिवीगाळ केली होती, तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्याला धमकावल्याची गंभीर तक्रारही त्यांच्या विरोधात होती. या गैरवर्तणुकीचा अहवाल नंदकुमार ठाकूर यांनी वरिष्ठांकडे सादर केला होता. या प्रकरणात पोलीस महासंचालक कार्यालयाने सुनावणी घेतल्यानंतर सुनील नागरगोजे यांना सेवेतून बडतर्फ केले आहे. पोलीस निरीक्षक सुनील नागरगोजे यांना स्थानिक गुन्हे शाखेत पोस्टिंग हवी होती. यासाठी त्यांनी नेत्यांमार्फत दबावही टाकला. मात्र, पोलीस अधीक्षकांनी त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने त्यांनी अधिकाऱ्यांना शिवीगाळ आणि धमक्या दिल्या, असा आरोप आहे. नागरगोजे यांची कारकीर्द वादग्रस्त राहिलेली असून, त्यांच्यावर याआधीही शिस्तभंगासंदर्भात आरोप झाले होते. अखेर त्यांच्या एकूण वर्तणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने त्यांना सेवेतूनच बडतर्फ केले आहे.

कायमस्वरुपी सेवेत रुजू करण्याची सभापती, सचिवांकडे मागणी

माजलगाव (प्रतिनिधी): येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मागील अनेक वर्षांपासून पहारेकरी या पदावर २०१० पासून सेवा केली असून बाजार समितीमध्ये कायमस्वरूपी रूजु करून घ्या अशी मागणी संतोष शाम टाकणखार यांनी सभापती, सचिव यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे. निवेदनाची दखल न घेतल्यास दि. १ मे रोजी कामगार दिनापासून उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि. २४ फेब्रुवारी २०१० पासून आजघडीला सुमारे १५ वर्षे पहारेकरी पदावर बाजार समितीमध्ये नियमीत प्रामाणिक सेवा केली आहे. वारंवार पत्र व्यवहार करूनहही सभापती, सचिव यांच्याशी चर्चा करून निष्ठावंत कर्मचाऱ्यांवर अन्याय केला आहे. त्यामुळे माझा कार्यकाळ पाहता प्राधान्याने कायमस्वरूपी सेवेत समावुन घ्यावे अन्यथ बाजार समिती कार्यालयासमोर दि. १ मे पासून उपोषण करण्याचा इशारा संतोष टाकणखार यांनी दि. २४ एप्रिल रोजी सभापती, सचिव यांना निवेदनाव्दारे दिला आह

महाराष्ट्रातील वातावरणात मोठे बदल

महाराष्ट्रातील वातावरणात मोठे बदल होणार आहे. राज्यात उष्णतेचा अलर्ट दिला आहे. त्याचवेळी काही भागांत गारपीट आणि पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे एकीकडे उन्हाचा तडाखा अनुभवताना पावसाचे संकटही राज्यावर असणार आहे. मु ंबईतील तापमानात वाढ होत आहे. तसेच मुंबईतील काही भागांमध्ये हलक्या सरी कोसळण्याच्या अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यात सध्या सर्वत्र उन्हाचा तडाखा आहे. अनेक ठिकाणी तापमान ४० अंशाच्या वर आहे. विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तापमान ४२ अंशावर पोहचले आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांना २७ एप्रिलला उष्णतेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच विदर्भ आणि मराठवाड्यातील इतर काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी दिला आहे. भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांना २८ एप्रिलला ऑरेंज अलर्ट दिला आहे. नागपुरात गेल्या चार दिवसांपासून पारा ४४ अंशावर आहे. वातावरणातील कोरडेपणामुळे उन्हाची तीव्रता अधिक आहे. २६ ते २९ एप्रिल दरम्यान ढगाळ वातावरणामुळे नागपुरातील तापमानात एक किंवा दोन अंशाची घसरण होण्याची शक्यता आहे. विदर्भातील चंद्रपुरात ४५.४ आणि अकोल्यात ४५.१ अंश सेल्सियस कमाल तापमान नोंदविण्यात आले. राज्याच्या बहुतांश भागांमध्ये उष्ण व दमट हवामान राहील. तसेच पाऊस पडण्याचीही शक्यता आहे.

एकीकडे युद्धाचे सावट, त्यात पाकिस्तानमधील लाहोर विमानतळावर भीषण आग

लाहोर (वृत्तसंस्था) पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील संबंध कमालीचे ताणले गेले आहेत. दोन्ही देशांमध्ये कधीही युद्धाची ठिणगी पडेल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा तणावाच्या परिस्थितीत आज पाकिस्तानमधील लाहोर विमानतळावर मोठी दुर्घटना घडली आहे. लाहोर विमानतळावरआग लागली असून, या आगीमुळे सर्व उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार पाकिस्तानच्या हवाई दलाचं एक विमान लाहोर विमानतळावर उतरत असताना टायरला आग लागली. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन दलाच्या बंबांना पाचारण करण्यात आले. तसेच ही घटना घडल्यानंतर ही धावपट्टी काही काळासाठी बंद करण्यात आली आहे. तसेच येथील संपूर्ण व्यवस्थापनाचं नियंत्रण पाकिस्तानी लष्कराने ताब्यात घेतलं आहे. दरम्यान, लाहोरमधील अल्लामा इक्बाल आंतरराष्ट्रीय विमानतळावर लागलेल्या आगीचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. तसेच या व्हिडीओमध्ये विमानतळावर उपस्थित असलेले लोग धुरामुळे त्रस्त झालेले दिसत आहेत. तसेच आगीमुळे काळ्या धुराचे लोळ वर उठताना दिसत आहे. मात्र या आगीमध्ये कुठल्याही प्रकारचं नुकसान झाल्याचं वृत्त अद्याप समोर आलेलं नाही.

सौ. दिपाली पवार यांची सावित्री महिला प्रतिष्ठान सोलापूर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती; मंत्री जयकुमार गोरे व अन्य मान्यवरांकडून सत्कार

सोलापूर :सौ. दिपाली केशव पवार यांची सावित्री महिला प्रतिष्ठान, सोलापूर जिल्हा अध्यक्षा पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून हार्दिक अभिनंदन होत आहे. यानिमित्ताने महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा. श्री. जयकुमार गोरे साहेब यांनी सौ. दिपाली पवार यांना मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. या आनंददायी प्रसंगी संत शिरोमणी सावता महाराज वंशज मंडळींनी सौ. दिपाली पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ. रूपाली ताई चाकणकर यांचे चुलते मा. श्री. पोपटराव बोराटे (सरपंच, नांदूर, ता. दौंड) यांनी देखील पुष्पगुच्छ देऊन सौ. दिपाली पवार यांचा गौरव केला. कार्यक्रमात मा. श्री. शरदराव रासकर (सरचिटणीस, भाजपा किसान मोर्चा, पुणे जिल्हा व संस्थापक प्रदेश सल्लागार, सावित्री महिला प्रतिष्ठान) यांच्यासह विविध मान्यवर व प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती होती. या प्रसंगी सौ. दिपाली पवार यांनी आपल्या नव्या जबाबदारीबाबत मनोगत व्यक्त करत महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रभावीपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

बीड (प्रतिनिधी) दिनांक २२/०४/२०२५ रोजी पेहलगाम जिल्हा अनंतनाग काश्मीर येथे दहशतवादयानी पर्यटकांवर हल्ला करून निष्पाप २८ नागरिकांची हत्या केली आहे.सदर घटना माणुसकीला काळिमा फसणारी आहे. सदर घटनेचा बीड जिल्हा वकील संघाने निषेध व्यक्त करून बीड जिल्ह्याचे नव निर्वाचित जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांना बीड वकील संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले या वेळी बीड वकील संघांचे अध्यक्ष ऍड. रोहिदास येवले, उपाध्यक्ष ऍड. अविनाश गडगे, सचिव ऍड. यासेर पटेल, सहसचिव ऍड. श्रीकांत जाधव, ऍड. प्रवीण राख, ऍड. उद्धव रासकर उपस्थित होते.

डॉ.सुशील धानुरे यांच्याकडून पहलगाम हल्ल्यातील मृत पर्यटकांना श्रद्धांजली

जालना/प्रतिनिधी

जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी निष्पाप पर्यटकांना आपली जात विचारून गोळ्या घालून ठार केले त्यांच्या वरील संताप म्हणून त्यांचा निषेध करून मृत झालेल्या भारतीय पर्यटक नागरिकांना जालना येथील डॉ.सुशील धानुरे यांनी श्रद्धांजली अर्पण केली. प्रत्येक बॉर्डर जवळील पर्यटक स्थळावार सेक्युरिटी अत्यंत गरजेचे आहे व हा कायदा पास झाला पाहिजे सामान्य माणसाच्या हितासाठी. जय हिंद.दहशतवादी हल्ला प्रकरणी गमावलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली, त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात संपूर्ण देश सहभागी आहे.घटनेतील जखमी नागरिक लवकरात लवकर बरे व्हावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना. डॉ सुशील धानूरे यांनी भावना व्यक्त केले.

बृहन्मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळा,मुंबई येथे मुख्याध्यापक प्र.पदावर कार्यरत असणारे श्रीराम दिपा चव्हाण,यांना राष्ट्रीय विद्याभूषण पुरस्कार 2025 प्राप्त

प्रतिनिधी/जालना- देश की बात फाऊंडेशन तथा WORLD HUMANITY COMMISSION USA आणि रायबा बहुद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने One Day Multidisciplinary International Conference on Transforming India या विषयावर तसेच शैक्षणिक शालेय स्तरावर Outstanding काम केल्याबद्दल राष्ट्रीय विद्याभूषण पुरस्कार दिनांक 26 एप्रिल 2025 रोजी Achievers College कल्याण येथे देण्यात आला. बृहन्मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळेत गेल्या 16 वर्षांपासून अविरत शालेय क्षेत्रात काम कार्य करणारे मुख्याध्यापक श्रीराम दिपा चव्हाण रा.पाहेगाव,ता. जि.जालना येथील रहिवाशी असून सद्या वसई येथे राहत आहेत.यांनी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल देश की बात फाउंडेशन कडून राष्ट्रीय विद्याभूषण पुरस्कार २०२४-२०२५ नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार देण्यात आला.या समवेत त्यांच्या पत्नी सौ.रंजना चव्हाण आणि श्रीराम चव्हाण या दोघांनी पुरस्कार स्वीकारला.याबद्दल अनेक सामाजिक,राजकीय तसेच शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मानोरा शहर कडकडीत बंद

विश्व हिंदू परिषद बजरंग दल आणि भारतीय जनता पार्टी तर्फे २६/४/२०२५ शनिवारला काश्मीर मधील पहेलगाम येथे पाकिस्तानी अतिरेक्यांनी केलेला हिंदूचं अमानुष हत्याकांडाच्या निषेधार्थ दुपारी बारा वाजेपर्यंत मानोरा शहर बंदचे आवाहन केले होते. या आव्हानाला मानोरा शहर मधील व्यापारी बांधवांनी व फूटपाथ वरील व्यवसायिकांनी उत्स्फूर्त पाठिंबा दर्शवून मानोरा शहर कडकडीत बंद ठेवले. दूध विक्री भाजीपाला विक्री मेडिकल व दवाखाने यांना बंद मधून वगळण्यात आलं होतं. बंगला सर्वांनी पाठिंबा दिल्याबद्दल विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि भारतीय जनता पार्टी तर्फे सर्व व्यापारी बांधवांचे व व्यावसायिक यांचे आभार मानण्यात आले

जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा कोळीबोडखा (केंद्र पाचोड) येथील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश

प्रदीप पोटफोडे

जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा कोळीबोडखा (केंद्र पाचेड, तालुका पैठण) येथील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तम यश मिळवले आहे. इयत्ता ५वीच्या उर्दू शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल ८०% तर इयत्ता ८वीच्या उर्दू शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल ६६.६६% इतका लागला आहे. या घवघवीत यशाबद्दल सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे. इयत्ता आठवी मधून शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थी:

१) आयशा जाकेर शेख
२) आयशा मुजीब शेख
३) फरहान अलीम शेख
४) शिफा अन्सार सय्यद
५) जैद जिब्राईल शेख
६) शिफा रईस शेख
७) शिफा अकील शेख
८) सुमेरा शाकेर शेख

इयत्ता पाचवी मधून शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थी:

१) आलिया अनीस शेख
२) अबुतल्हा शमशेर शेख
३) आलिया फिरदोस नईम शेख
४) जोहेब जिब्राईल शेख
५) मुताहीर अलीम सय्यद
६) शोएब अनीस शेख

७) सिद्दीक मंजूर शेख
८) राबिया जाहेर शेख
९) रुखैय्या हयाजअली सय्यद
१०) अदनान जाकेर शेख

तसेच मराठी माध्यम मधील इयत्ता पाचवीतील विद्यार्थी रुखैय्या हयाजअली सय्यद, अदनान जाकेर शेख मराठी माध्यम मग त्यांच्या उत्तीर्ण झाले आहेत, या यशामागे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य मोठे आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांनी यशाची ही परंपरा कायम ठेवावी, अशी शुभेच्छा व्यक्त करण्यात आली आहे.

पेंडॉल व वृक्षारोपणच्या नावाखाली माजलगावच्या बाजार समितीची २२ लाखाची उधळपट्टी

माजलगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवाने १३२ जणांना बेकायदेशीर डव्हान्स दिल्यानंतर अजून एक घोटाळा उघडकीस आला आहे यामध्ये पेंडॉलच्या नावाखाली बाजार समितीने नियम बाह्य व कोणत्याही प्रकारचे वृक्षारोपण न करता नियमबाह्य पद्धतीने वृक्षारोपणाच्या नावाखाली व पेंडॉलच्या नावाखाली २२ लक्ष रुपयाच्या कामावर उधळपट्टी केल्याचे उघडकीस आल्याचे आहे. बाजार समितीचे अभिलेखाचे पडताळणी केली असता मार्च २०२२ अखेरीस बाजार समितीने ७१,०९४७३ एवढी रक्कम संचालक व कर्मचारी व इतर ऍडव्हान्स म्हणून वाटप केल्याचे दिसून येते या अजय राऊत यांच्या तक्रारीवरून या रकमेपैकी बाजार समितीने मार्च २०२५ अखेरीस ४३००००० लाख एवढी रक्कम वसूल केली आहे. ३० लाख रुपये एवढी ॲडव्हान्स रक्कम अद्याप वसूल करणे बाकी आहे. एवढा ऍडव्हान्स देऊनही पुन्हा बाजार समितीने पेंडॉल च्या नावाखाली नियमबाह्य १६ लाख २८ हजार १०० रू. खर्च हा बाजार समितीने जिनिंगवर शेत माल विक्रीसाठी घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांच्या सोयीसाठी खर्च केल्याचे नमूद केले आहे बाजार समितीने खर्च करून अशा सूचना संबंधित लेखापरीक्षक यांनी लेखापरीक्षा अहवालात केलेले आहे ही रक्कम तर बाजार समितीच्या दैनंदिन किर्दीस दिसून येतात. याबरोबरच कोणत्याही प्रकारचे वृक्षा रोपण न करता नियमबाय पद्धतीने वृक्षारोपणाच्या नावाखाली ५,४३७५ रू. बाजार समितीने वृक्षरोपणासाठी दि. ३१-०३-२०२० रोजी देवानंद ग्रोटेक यांना सांगली अर्बन बँक शाखा माजलगाव चा वेगवेगळ्या रकमेचे धनादेश दिल्याचे लेखा परीक्षण अहवालात नमूद केलेले आहे. अशाप्रकारे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवाने नियमबाह्य पेंडॉल व वृक्षारोपण च्या नावाखाली २२ लक्ष रुपयांची उधळपट्टी केल्याचा घोटाळा उघडकीस आला आहे. शेत माल विक्रीसाठी जिनिंग वर घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांना पिण्याचे पाणी वाटप करण्यासाठी महिला कर्मचारी साठी प्रतिदिन १७० रू. प्रमाणे दहा महिलांना पाच महिन्याचे मजुरी पोटी २५६७०० रु. नियमबाह्य खर्च मोंढ्यात वॉटर फिल्टर साठी पाच लाख रुपये खर्च नवीन मोंढा येथे शेतकऱ्यांसाठी व व्यापाऱ्यांसाठी शुद्ध पाणी मिळावे यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने वॉटर फिल्टर ची रूम बांधण्यासाठी ५१०४७५ रूपये एका बिल्डरच्या घशात घातले. आज रोजी मोंढ्या मध्ये पाण्याचा ठणठणाट दिसून येत आहे. परंतु वॉटर फिल्टर साठी लाखो रुपये खर्च केल्याचे दिसून येत आहे.

26 एप्रिल : जागतिक बौद्धिक संपदा दिवस

(World Intellectual Property Day) (विक्रांत शिरसाट) दरवर्षी २६ एप्रिल रोजी जागतिक बौद्धिक संपदा दिवस साजरा केला जातो. या दिनाच्या निमित्ताने जागतिक बौद्धिक संपदा संघटना (World Intellectual Property Organization - WIPO) आणि आंतरराष्ट्रीय समुदाय बौद्धिक संपदा (Intellectual Property - IP) हक्कांचे महत्त्व अधोरेखित करतात. तसेच नवोन्मेष (Innovation) आणि सर्जनशीलतेला (Creativity) प्रोत्साहन देण्यात बौद्धिक संपदेची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर प्रकाश टाकला जातो. जागतिक बौद्धिक संपदा दिनाचा उद्देश: १) बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व अधोरेखित करणे: बौद्धिक संपदा हक्क म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या बौद्धिक निर्मितीवर मिळणारे कायदेशीर हक्क. या हक्कांद्वारे निर्मात्याला त्याच्या कल्पनेचे, संशोधनाचे, साहित्यिक किंवा कलात्मक निर्मितीचे विशिष्ट कालावधीसाठी संरक्षण दिले जाते. २) नवोन्मेष आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे: बौद्धिक संपदा हक्क संशोधन, विकास आणि नवनवीन तंत्रज्ञान तयार करण्यासाठी व्यक्तींना आणि कंपन्यांना प्रेरणा देतात. त्यामुळे सामाजिक आणि आर्थिक प्रगतीला चालना मिळते. ३) जागरूकता वाढवणे: या दिनाच्या माध्यमातून लोकांमध्ये बौद्धिक संपदेविषयी जागरूकता निर्माण केली जाते आणि त्यांना त्यांच्या हक्कांची माहिती दिली जाते. जागतिक बौद्धिक संपदा दिवसाचे महत्त्व:

- बौद्धिक संपदा हक्क नवकल्पना व नवउद्योगांना संरक्षण देतात, जे आर्थिक प्रगतीत महत्वाचे योगदान देतात.
- सांस्कृतिक विविधता आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळते.
- व्यक्ती आणि संस्थांना त्यांच्या कल्पनांचे आणि निर्मितीचे योग्य श्रेय मिळते व त्यांना आर्थिक फायदाही मिळतो.

WIPO च्या भूमिकेविषयी: जागतिक बौद्धिक संपदा संघटना (WIPO) हा संयुक्त राष्ट्रांचा एक विशेष संघटन आहे, जो जगभरात बौद्धिक संपदेचे संरक्षण आणि प्रचार करण्याचे काम करतो. WIPO दरवर्षी जागतिक बौद्धिक संपदा दिवसासाठी एक विशिष्ट थीम निवडतो, जी त्या वर्षीच्या विशेष मुद्द्यावर केंद्रित असते. २०२५ च्या जागतिक बौद्धिक संपदा दिवसाची थीम: सध्या वर्ष २०२५ साठी जागतिक बौद्धिक संपदा दिवसाची अधिकृत थीम अद्याप जाहीर झालेली नाही. WIPO लवकरच ही थीम जाहीर करणार आहे, ज्यावर आधारित विविध देशांमध्ये कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन केले जाईल.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २७ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com

राज्यात मंत्रिपदांची खांदेपालट कधी होणार अजितदादांनी थेट वेळच सांगितली

राज्यात सध्या महायुतीचे सरकार आहे. 2024 सालची विधानसभा निवडणूक भाजपा, राष्ट्रवादी (अजित पवार), शिवसेना (शिंदे गट) यांनी एकत्र मिळून लढवली. त्याचेच फळ म्हणून आज हे तिन्ही पक्ष सत्तेत आहेत. दरम्यान, तीन पक्ष एकत्र असल्यामुळे महायुतीत वेगवेगळ्या कारणांमुळे रस्सीखेच पाहायला मिळते. मंत्रिमंडळ विस्तारावेळी अशीच चढाओढ पाहायला मिळाली होती. विशेष म्हणजे या तिन्ही पक्षांतर्गतही मंत्रिपदाला गवसणी घालण्यासाठी शर्यत लागली होती. असे असतानाच आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा एकदा मंत्रिमंडळ विस्ताराबाबत मोठं विधान केलंय. अजित पवार नेमकं काय म्हणाले? अजित पवार हिंगोलीत बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर भाष्य केलं. भाषणादरम्यान त्यांनी मंत्रिमंडळाची खांदेपालट अर्थात मंत्रिमंडळ विस्ताराबाबत भाष्य केलं. "अडीच वर्षामध्ये नवीन लोकांना मंत्रिपदाची संधी

देणार, असा शब्द दिलेला आहे. तो शब्द मी पाळणार आहे. त्यामुळे चिंता करू नका," असं अजित पवार यांनी म्हटलंय. अजितदादा अडीच वर्षांचा फॉर्म्यूला पाळणार का? राज्यात 2024 सालची विधानसभा निवडणूक झाल्यानंतर महायुती सरकार स्थापन झाले होते. त्यानंतर डिसेंबर 2024 मध्ये या सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला होता. यावेळी आम्हालाच महत्त्वाची खाती मिळावी, यासाठी तिन्ही पक्षांमध्ये चांगलीच रस्सीखेच पाहायला मिळाली होती. शेवटी एकमत झाल्यानंतर मंत्रिमंडळ विस्तार जाहीर करण्यात आला होता. यावेळी अजित पवार यांच्या पक्षाने मंत्रिपदं देताना अडीच वर्षांचा विशेष फॉर्म्यूला ठरवला होता. नेमकं काय ठरलं होतं? सध्या ज्या नेत्यांना मंत्रिपदं देण्यात आली होती, त्यांना पुढच्या अडीच वर्षांनी खुर्ची खाली करावी लागणार, असे त्यावेळी ठरले होते. म्हणजेच या पुढच्या अडीच वर्षांनी नव्या नेत्याला मंत्रिपदाची संधी देण्याचा फॉर्म्यूला समोर ठेवला होता. याच फॉर्म्यूलाचा अजित पावर यांनी हिंगोलीत नव्याने उल्लेख केला आहे. मी नवीन लोकांना मंत्रिपदाची संधी देणार, असं असं मी म्हटलं

महिला, मुलींना उचलून नेतात, अत्याचारांमुळे पाकिस्तान सोडून भारतात आलो - पाकिस्तानी नागरिकांनी मांडली कैफियत

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतलादी हल्ल्यात 26 निष्पाप नागरिकांना जीव गमावावा लागला. पर्यटनाचा, सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी आलेल्या लोकांना दहशतवाद्यांवनी त्यांच्या कुटुंबियाच्या डोळ्यादेखत गोळ्या झाडून ठार केलं. या हल्ल्यानंत संपूर्ण देशात क्रोधाचं , संतापाचं वातावरण असून दहशतवाद्यांची नांगी ठेता, त्यांना मदत करणाऱ्या पाकिस्तानालही धडा शिकवा अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे. या हल्ल्यानंतर भारत सरकारने कठोर पावलं चलंत पाकिस्तानची कोंडी करण्याचाही प्रयत्न केला आहे. त्याच पार्श्वभूमीवर महत्वाचे निर्णय घेण्यात आलेत. सिंधू कराराला स्थगिती, भारतातील पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करून त्यांना त्यांच्या देशात परत जाण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.48 तासांत पाकिस्तांनी नागरिकांना भारत सोडून जाण्याचे निर्देश देण्यात आले असून अनेक जण पाकिस्तानात परतत आहेत. भारतात राहणारे पाकिस्तानी हा मुद्दा चर्चेत आला असून जळगावध्येही अनेक पाकिस्तानी नागरिक वास्तव्याला आहे. लाँग टर्म व्हिसा घेऊन ते भारतात रहात आहेत. आम्हाला आता पुन्हा पाकिस्तानात जायचं नाही, आम्हाला भारताचं कायमचं नागरिकत्व मिळावं, अशी त्यांची मागणी असून कायदेशीर प्रक्रिया देखील सुरू आहे. पाकिस्तानात घडणाऱ्या घटना, अत्याचार,

वाटणारी भीती या सर्वांना कंटाळून अनेक पाकिस्तानी नागिरकांनी भारतात येऊन स्थायिक राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्यातील अनेक महिलांनी त्यांची कैफियत मांडली आहे.रोजच्या जगण्याचा संघर्ष आम्ही पाकिस्तानाता 50 वर्ष राहिलोय, आता दोन वर्षांपासून इथे भारतात, जळगावात येऊन राहतोय. तिकडे परिस्थिती ठीक नव्हती, गॅस नाही, पाणी, लाईट नाही, काहीच नव्हतं , खूप त्रास व्हायचा. त्याउप्पर म्हणजे तिथे राहताना भीती वाटायची. तिथे आम्ही कामधंदा करायचो, पण संध्याकाळी 5 वाजता दुकान बंद करायचो, घाबरून घाबरू रहायचो, असा अनुभव एका गृहस्थांनी सांगितला. रोजच्या अत्याचाराला कंटाळून आम्ही पाकिस्तान सोडलंआम्ही जळगावात 3-4 वर्षांपासून राहतोय. तिथे(पाकिस्तान) वातावरण खूप खराब होतं, बाहेर पडणं देखील मुश्कील होतं , खूप भीती वाटायची असं एका महिलेने सांगितलं. पण इथे चांगलं वाटतं असं एका महिलेने सांगितलं. महिला मुली पाकिस्तानात सुरक्षित नाहीत , बाहेर फिरणं तर सोडाच दिवसभर

चिंचोली माळी सबस्टेशन चा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

केज : केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील ३३ के. व्ही. उपकेंद्राअंतर्गत हादगाव फिटर आहे. हादगाव शिवारामधील शेतकऱ्यांना आणि लोकांना फाट्यावर मारत अधिकारी भोयर आणि लांडगे लाईनमन यांच्या वरदहस्ताने या शिवारातील लाईट डायरेक्ट उस्मानाबाद जिल्ह्यातील आथर्डी तालुका कळंब या गावाला पुरवली जाते. याचा परिणाम असा होत आहे की हदगाव व भोपला या गावांना दोन दिवस आड थ्री फेज लाईट येत आहे. मग सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे एकदा भरून ठेवलेले पाणी दोन दिवस जनावरांना व माणसांना कसे पुरणार त्यामुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठा गंभीर झालेला आहे. आश्चर्य या गोष्टीचे आहे. की याचा थांगपत्ता सय्यद साहेब उप कार्यकारी अभियंता महावितरण केज यांनाही नाही ही माहिती सय्यद साहेब यांना सांगूनही यावर कार्यवाही का होत नाही अशी चर्चा शेतकरी करत आहे. मग येथील शेतकऱ्यांना लोडसेडिंग सहन करायला लावून लाईटचा अतिरिक्त भार दुसऱ्या जिल्ह्यासाठी का वापरला जातो?

रणजित कासलेची हर्सूलमध्ये रवानगी

बीड : पोलिस दलातून पोलिस उपनिरीक्षक पदावरून बडतर्फ आणि ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडीत असलेल्या रजणित कासले याची औरंगाबादच्या हसू ल कारागृहात रवानगी करण्यात आली. जिल्हा कारागृहात सध्या वाल्मीक कराड व इतर आरोपी आहेत. त्यांच्याबाबत कासलेने धक्कादायक दावे केल्याने त्याला

इतरत्र हलविण्यात आले. निलंबन काळात सोशल मीडियावरून वादग्रस्त वक्तव्य आणि गंभीर आरोप करणाऱ्या रणजित कासलेवर ट्रॉसिटीचा गुन्हा नोंद आहे. यासह त्याच्यावर परळीत निवडणुकीबाबत आणि अंबाजोगाईत फसवणुकीचाही गुन्हा नोंद आहे. त्याला पोलिस दलातून बडतर्फ करण्यात आले.

ज्या तुरुंगात वाल्मिक कराड, तिथला धक्कादायक प्रकार समोर; दोन अधिकाऱ्यांचे तडकाफडकी निलंबन!

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. हे प्रकरण नंतर चांगलेच गाजले. या हत्येनंतर बीडमधील गुंडाराजचे एकापेक्षा एक धक्कादायक अशी प्रकरणं समोर आली. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड हा प्रमुख आरोपी असून सध्या तो बीडच्या तुरुंगात आहे. दरम्यान, तो ज्या तुरुंगात आहे, त्याच तुरुंगाबाबत एक मोठी माहिती समोर येत आहे. कराड असलेल्या कारागृहातील वरिष्ठ तुरुंग अधिकाऱ्याला आणि एका महिला शिपायाला निलंबित करण्यात आलं आहे. तुरुंग अधिकाऱ्यांवर केली मोठी कारवाई मिळालेल्या माहितीनुसार वाल्मिक कराड ज्या तुरुंगात आहे, त्याच तुरुंगाचे वरिष्ट अधिकारी डी. डी. कवाळे आणि महिला शिपाई सीमा गोरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे ही कारवाई करत असताना त्यांच्यावर मोठा ठपका ठेवण्यात आला आहे. रक्ताच्या नातेवाईकांव्यतिरिक्त इतर लोकांना कैद्यांना भेटू दिल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. तपासणीत धक्कादायक सत्य आलं समोर तसेच कारागृहात अनेक त्रुट्या आढळून आल्यानेही ही कारवाई करण्यात आली आहे. कवाळे नामक अधिकाऱ्यांकडे दीड महिन्यांपूर्वी बीड कारागृहाचा तात्पुरता पदभार देण्यात आला होता. यादरम्यान कारागृह महासंचालक कार्यालयातील एका पथकाने बीड कारागृहाची तपासणी केली होती. या तपासणीदरम्यान अनेक त्रुट्या आढळून आल्या होत्या. त्यामुळेच पुणे येथील अपर पोलीस महासंचालकांना ही मोठी कारवाई केली आहे. सुरेश धस यांनी केली मोठी मागणी दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून भाजपाचे आमदार सुरेश धस यांच्याकडून संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना वेगवेगळ्या तुरुंगांत ठेवावं अशी मागणी केली जात आहे. बीडच्या तुरुंग प्रशासनाबाबत अनेक तक्रारी निश्चितच आहेत. याबाबतचे काही पुरावे हाती येत आहेत. त्यानंतर आम्ही पुराव्यासहित तक्रार करू, असं सुरेश धस यांनी म्हटलंय. तसेच संतोष देशमुख यांच्या खून्यांना एका जागेवर ठेवू नये ही मागणी आम्ही करणार आहोत, असंही त्यांनी सांगितलंय. त्यामुळे आता तुरुंग अधिकाऱ्यांचे निलंबन झाल्यामुळे आगामी काळात नेमकं काय होणार?

जुलै अखेर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अरण तीर्थक्षेत्राच्या विकासाचा शुभारंभ....जयकुमार गोरे, पालकमंत्री

माढा प्रतिनिधी:- शाहू फुले आंबेडकराच्या महाराष्ट्रामध्ये महापुरुषांच्या स्मारकांसाठी आणि साधूसंतांच्या धार्मिक स्थळांसाठी शासन निधीची कमतरता भासू देणार नाही. ही आमची ऊर्जास्थाने, शक्तीपीठे असून यांचा विकास करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शासन कटिबद्ध असल्याचे सांगतानाच संतश्रेष्ठ सावता महाराजांच्या अरण तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा येणाऱ्या कॅबिनेटमध्ये मंजूर करून 24 जुलै च्या अगोदर सर्व प्रशासकीय आणि कायदेशीर बाबींची पूर्तता करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विकासकामांचे भूमिपूजन करण्याचा शब्द ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिला . अरण ता माढा येथे आयोजित चंदन उटी कार्यक्रम आणि भक्त परिवाराच्या मेळाव्या प्रसंगी ते बोलत होते.

आपल्या भाषणात 730 वर्षाच्या धार्मिक परंपरेचा वारसा असणाऱ्या संत सावता महाराजांच्या अरण नगरीचा विकास आजपर्यंत झाला नाही याची खंत व्यक्त करतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाला गती दिल्याचे सांगून या अगोदरच्या सत्ताधाऱ्यांवरती त्यांनी निशाणा साधला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव या जन्मठिकाणा चा विकास करण्यासाठी दहा एकर क्षेत्र विकत घेत 145 कोटी रुपये ची तरतूद केली. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कडगुण या जन्मस्थळाचेही स्मारकांमध्ये रूपांतर करण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे .छत्रपती शिवाजी महाराजांच्या सह महाराष्ट्रातील सर्वच महापुरुषांच्या स्मारकाचा विकास करणे आपल्या शक्ति स्थळांचा ऊर्जास्थानांचा विकास करणे यासाठी शासन कुठल्याही प्रकारच्या निधीची कमतरता भासू देणार नसल्याचे त्यांनी पुन्हा एकदा सांगितले . एका सर्वसामान्य घरातील ज्याचा कारखाना नाही ,मोठा उद्योग नाही, अशा एका रेशन दुकानदाराचे पोरगं चार वेळा आमदार झालं आणि आता मंत्री झालं याचे श्रेय फक्त आणि फक्त भारतीय जनता पक्ष आणि देवेंद्र फडणवीस यांचेच असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. प्रमुख अतिथी तथा इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री नामदार अतुल सावे यांनी अरणच्या तीर्थक्षेत्रासाठी पाहिजे तेवढा निधी देऊ, पैशाची काळजी करू नका. सावित्रीबाई फुले स्मारकास सुद्धा निधी मंजूर केला आहे. महात्मा फुले यांच्या भिडे वाड्याचा प्रश्न कोर्टातून सरकारच्या बाजूने सुटला आहे. यामुळे भिडेवाड्याचा विकास यापुढे होणार आहे. महात्मा फुले यांचा राहते घर" फुले वाड्या" साठी 100 कोटी रुपयांची तरतूद सरकारने केली आहे. ओबीसी मंत्रालयाच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकरी सर्वसामान्य नागरिक सक्षम झाले पाहिजेत असे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी आणि राज्य सरकार यांचे धोरण आहे .ओबीसी मंत्रालयाच्या माध्यमातून पूर्वी फक्त दहा विद्यार्थ्यांना मिळणारी परदेश शिक्षणासाठीची शिष्यवृत्ती वाढवत वाढवत आता 100 वर आणली आहे .त्यासाठी असणारी 20 लाख रुपये मर्यादा 40 लाखापर्यंत नेल्याचे त्यांनी सांगितले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com